International Multilingual Research Journal ®

Vidyawarta

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

(Special issue)

GOLDEN JUBILEE YEAR
1967-2017
1966-2016
सुवर्ण महोत्सवी वर्ष

Shri Balaji Sansthan Deulgaon Raja's

**Shri Vyankatesh Arts, Commerce and Science College,**

Deulgaon Raja, Dist. Buldana - Pin : 443204

NAAC RE-ACCREDITED AT 'B' LEVEL

# ITIHAS MIMANSA

## (इतिहास मीमांसा)

Chief Editor

**Asst. Prof. R.H.Devare**

Harshwardhan Publication Pvt.Ltd.

10

# मध्ययुगीन काळातील कर्तृत्ववान स्त्री राजमाता जिजाऊ

डॉ. एस. एन. तुरुकमाने
इतिहास विभाग प्रमुख,
संत भगवानबाबा कला महाविद्यालय सिंदखेडराजा, जि.बुलढाणा

प्राचीन काळापासून भारतात अनेक कर्तृत्ववान स्त्रिया होऊन गेल्या. त्यांनी कला, साहित्य, राजकारण या क्षेत्रात नावलौकीक मिळविला. त्यामध्ये राजमाता जिजाऊ यांचे नाव अग्रक्रमाने व मोठया आदराने घ्यावे लागते. इतिहास प्रसिध्द लखुजी राजे यांच्या कन्या व शहाजी राजे यांच्या पत्नी असलेल्या जिजाऊ साहेबांना राजकारण, समाजकारण व युध्दकौशल्याचे धडे बालपणापासूनच मिळाले होते. त्याआधारे त्यांनी बाल शिवबावर बालपणीच उत्कृष्ट संस्कार करुन राजकीय, लष्करी शिक्षण दिले. तसेच स्वराज्य स्थापनेच्या कार्यात आयुष्यभर मार्गदर्शन करण्याचे कार्य केले. त्यामुळे शिवाजी महाराजांना हिंदवी स्वराज्य स्थापना करणे शक्य झाल्याचे दिसून येते.

**जिजाऊंचा जन्म बालपण :**

जिजाऊंचे वडील राजे लखुजीराव जाधव हे सिंदखेड येथे निजमशहाचे १०,०००, हजारी मनसबदार होते. सिंदखेड राजा येथे १२ जाने १५९८ रोजी सुर्योदया समयी सकाळी ६ वा. पौष पोर्णीमेला जिजाऊंचा जन्म झाला.

संपूर्ण गावाला लखुजीरावांनी नगर भोजन दिल्याचा उल्लेखही आहे. अशा आनंदमय वातावरणातच जिजाऊंवर बालपणी संस्कार झाले असावेत. जिजाऊंची माता व वडील हे दोघेही सुसंस्कृत व प्रतिष्ठीत घराण्यातील होते. सिंदखेडच्या राजवाडयामध्येच जिजाऊंचे

बालपण गेले. ''राजकुटुंबातील स्त्रियांना पुरोहिताला घरी बोलावून जिजाऊंना रामायण, महाभारतातील कथानके तसेच दक्षिणेत होवून गेलेले चालुक्य, राष्ट्रकुट यादव आणि विजयनगरचे हिंदू साम्राज्य इ. शिक्षण जिजाऊंना दिल्या गेले. त्याचप्रमाणे घोडयावर बसणे, तलवार चालविण्याचे शिक्षण शास्त्रीय दृष्टया दिले. जिजाऊंचा विवाह लखुजी रावांनी आपल्या तोलामोलाच्या वेरुळ येथील भोसले घराण्यातील शहाजी सोबत सन १६०६ मध्ये दौलताबादला मालोजीच्या उपस्थितीत लावला. असा उल्लेख चिटणीस बखर, व शिव दिखजय बखर, शिवप्रताप बखर यातून माहीती मिळते. सन १६२४ पर्यंत शहाजी राजे यांची लष्करी छावणी दौलताबाद जवळच होती. दौलताबाद जवळचे वेरुळ हे शहाजी राजांचे मुळ पाटीलकीचे गाव. सन १६२४ मध्ये भात वाडीचे युध्द झाले त्यात शहाजी राजांनी प्रचंड पराक्रम गाजवून विजय मिळविला. मात्र या विजयामुळे निजामाचा वजीर मलीक अंबर शहाजीचा द्वेष करु लागला. त्यामुळे शहाजीने निजामशाही सोडून आदीलशाहीत प्रवेश केला.

दरम्यान १९ फेब्रुवारी १६३० ला शिवाजीचा जन्म झाला. शहाजी राजाची कर्नाटकात रवानगी केल्यानंतर जिजाऊ व बाल शिवबा यांना पुण्याच्या जहागीरीवर नियुक्ती करण्यात आली. त्यांनी या काळात प्रशासन व्यवस्था सांभाळली. यावरुन जिजाऊंचे कर्तृत्व दिसून येते.

**जिजाऊंनी शिवबावर केलेले संस्कार :**

जिजाऊवर अनेक घटनांचा व्यापक प्रभाव पडला होता. म्हणून त्यांनी शिवबाला लहानपणी, रामायण,महाभारत, राम, श्रीकृष्ण यांच्या कथेतून व चारित्र्यातून विशेष संस्कार जिजाऊंनी शिवबावर केले. शहाजी राजांनी शिवबाला युध्दकला, घोडयावर बसणे, कुस्ती, दांडपट्टा फिरविणे, तलवार चालवणे अशा प्रकारे वयाच्या १२ व्या वर्षा पर्यंत विविध विद्या व कलांचा परिचय झाला. त्यात ते पारंगत झाले. जिजाऊंच्या देखरेखी खाली शिवबाला उत्तम राज्यकारभार कसा करावा, शत्रुंशी युध्द कसे करावे, किल्ले कसे बांधावे, घोडे, हत्ती यांची परिक्षा

कशी करावी, शत्रुच्या दुर्गम प्रदेशातुन कसे निसटुन जावे. अशा अनेक विद्या शिवरायांना अवगत करुन दिल्या. शिवाजी राजांनी एकनिष्ठ मावळयांचे संघटन तयार केले. राजकारण, युध्दतंत्र, स्वराज्याबद्दलचा अभिमान, दुसऱ्या धर्माबद्दल आदर, शिस्त, साहस, अन्याया विरुध्द प्रतिकार, हे सर्व शिक्षण जिजाऊंनी शिवाजी राजांना बालपनी दिले होते. प्रशासन, न्यायनिवाडा, लोकसंघटन, माणसाची पारख हा वारसा शिवाजी राजांना जिजाऊ कडूनच मिळाला होता. जिजाऊंना जहागीरीच्या प्रशासनाच्या चांगला अनुभव होता. तसेच प्रशासनाची माहीती होती. त्यांच्या तालमितच शिवाजी राजांना प्रशासनाचे धडे मिळाले.

**अफजल खानाचा वध व जिजाऊंची भूमिका :**

शिवाजी राजांनी आदिलशहाच्या ताब्यातील किल्ले घेण्यास सुरुवात केली. शिवाजी एक–एक किल्ले घेत असतांना आदिल शहाने शिवाजीवर नियंत्रण मिळविण्यासाठी व नामोहरम करण्यासाठी अफजल खानास मोठे सैन्य देवून स्वारीवर पाठवले. खान हा क्रुर व कपटी होता. अशा कठीण व संकटप्रसंगी शिवरायांना जिजाऊंचे मार्गदर्शन मिळाले. जिजाऊ शिवाजीराजांना धिर देत म्हणाल्या 'शिवबा अफजल खानाच्या भेटी प्रसंगी तुम्ही कामी आलात तर भिती बाळगू नका. तुमच्या पाठीमागे मी शंभूराजास छत्रपती बनवून स्वराज्याची निर्मिती करीन" अशा दृढ निश्चयामुळे शिवाजी महाराजांना स्फुरण चढले व ते जिजाऊंचा आशिर्वाद घेवून प्रताप गडाकडे रवाना झाले.

**सिध्दी जोहरचा वेढा व जिजाऊंची भुमिका :**

अफजल खानाच्या वधानंतर स्वराज्यावर फार मोठे संकट कोसळले. सिध्दी जोहर याने पन्हाळ किल्यावर वेढा दिला. त्यात शिवाजी महाराज कोंडले गेले. दिवसें–दिवस वेढा अजुनच कठीण होत होता. यावेळी सेनापती नेताजी पालकर हे विजापुरकडे युध्दात गुंतले होते. अशा वेळी शिवाजी राजांना या वेढयातुन सुखरुप बाहेर काढण्यासाठी जिजाऊंनी हा वेढा तोडण्याचा स्वतः निर्णय घेतला. त्यांनी पुर्ण तयारीनिशी मोहीमेवर जाण्यासाठी स्वतः अंगावर लष्करी वेश चढविला. शेवटी नेताजी पालकर यांनी जिजाऊंची समजूत काढुन ते स्वतः पन्हाळ

गडाकडे रवाना झाले. शिवाजी राजांना या संकटातुन वाचविण्यासाठी जिजाऊंनी सर्व शक्ती पनाला लावली होती. शिवाजी राजांच्या अनुपस्थितीत स्वराज्याचे प्रशासन त्याच चालवत होत्या. व स्वराज्याचे संरक्षणही करत होत्या.

**शहाजी राजांचे निधन व राजमाता जिजाऊ :**

स्वराज्यावर एकापाठोपाठ ही संकटे येत असतानाच २३ फेब्रुवारी १६६४ ला शहाजी राजांचे निधन झाले. त्याकाळाच्या प्रचलित रुढी परंपरेनुसार पती निधनानंतर पत्नीने सती जाणे ही प्रथा होती. परंतु ही प्रथा जिजाऊंनी झुगारुन लावली. त्यांचा हा निर्णय फार महत्वाचा व क्रांतीकारी होता. पतीची व शिवबाची महत्वकांक्षा ही स्वराज्य निर्माण करण्याची होती त्या कार्याला त्यांनी स्वतःला वाहून घेतले.

**शिवाजी राजे यांची आग्राभेट व जिजाऊ :**

स्वराज्यावर एका मागुन एक संकटे येत असतानाच इ.स. १६६५ मध्ये मिर्झाराजे जयसिंग यांची स्वारी स्वराज्यावर आली. व शिवाजी राजांना मिर्झा राजे जयसिंग यांच्याशी पुरंदरचा तह करावा लागला त्यानुसार शिवाजी राजे व बाल संभाजी यांना आग्रा येथे जावे लागले व तेथे त्यांना कैदेत टाकले. परंतु अशा या संकटाच्यावेळी डगमगुन न जाता जिजाऊंनी कोकणातील आदिलशहाच्या ताब्यातील रांगणाकिल्ला घेतला. व शिवाजी स्वराज्यात परत येईपर्यंत स्वराज्याचा प्रशासकीय कारभार चोख पाहीला. यावरुन त्यांचे प्रशासन कौशल्य दिसून येते.

**शिवराज्याभिषेक व जिजाऊ :**

शिवाजी महाराजांनी स्वराज्य निर्मितीची प्रक्रिया पूर्ण केली होती. जिजाऊंनी शिवाजी राजांकडे राज्यभिषेकाचा आग्रह केला. त्यांनी रामजी दत्ता या रत्न शाळेचा अधिकाऱ्याकडून रायगडावरील सिंहासनाचे काम करवून घेतले. आपल्या वडीलांच्या स्वतंत्र राज्य निर्मितीचे स्वप्न पूर्ण व्हावे. जिजाऊंची राज्यभिषकाची इच्छा पूर्ण व्हावी म्हणूनच जून १६७४ ला रायगडावर विधिवत राज्यभिषेक सोहळा पार पडला.

अशा प्रकारे शिवाजीराजांना कुशल कारागिर प्रमाणे घडवून

त्याच्या हातुन स्वराज्य निर्माण केले. कठीण प्रसंगी शिवराय स्वराज्यात नसतांना ही त्यांनी स्वराज्याचे प्रशासन योग्य रितीने हाताळले रांगणा किल्ला ही जिंकला अशा या कर्तृत्ववान मातेचा स्वराज्यभिषेकानंतर १७ जून १९७४ रोजी पाचाड येथे त्यांचा मृत्यू झाला.

**संदर्भ सूची :**

१. देशमुख विजय,सिंदखेडराजा, संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालय विभाग, मुंबई, १९८२.

२. बाहेकर संतोष, राष्ट्रमाता जिजाऊ, कसब प्रकाशन, जळगाव,

३. मार्डीकर म, मो, मराठयांचा इतिहास, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, १९९८.

४. काळे. या. मा., वऱ्हाडचा इतिहास, बुलडाणा, १९२३,

५. बेंद्रे वा.सी., छत्रपती शिवाजी महाराजांचे चिकित्सकचरित्र,पार्श्व पब्लिकेशन,कोल्हापूर, २०१३,

६. मेहेंदळे ग. भा., श्री. राजा छत्रपती खंड १ व २, १९९६

७. कुरुंदकर नरहर, छत्रपती शिवाजी महाराज जिवन रहस्य,

८. कुलकर्णी अ.रा., शिवकालीन महाराष्ट्र, राजहंस प्रकाशन, पुणे, २००४,

❑❑❑